# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## नागपूर मेट्रोच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवाडाचे आयोजन







नागपूर : स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता या संकल्पनेस अनुसरून केंद्र सरकारच्या शहरी आवास व नगर विकास मंत्रालयाकडून आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत महा मेट्रोच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आणि उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध ठिकाणी करण्यात आलेल्या या उपक्रमांत जास्तीत जास्ती नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन महा मेट्रोच्या वतीने करण्यात आले आहे.

- स्वच्छता ही सेवा सेल्फी स्पर्धा : स्वच्छता ही सेवा पंधरवाडा अंतर्गत सिताबर्डी इंटरचेंज, लोकमान्य नगर,प्रजापती नगर,आटोमोटिव्ह चौक आणि खापरी मेट्रो स्टेशन येथे सेल्फी बूथ तयार करण्यात आले असून मेट्रो प्रवाश्यानी या ठिकाणी सेल्फी काढून

photocontest.nmrcl@gmail.com या ईमेल वर पाठवावी लकी ड्रॉ द्वारे विजेत्यांना आकर्षक बक्षिस दिले जातील या स्पर्धेचा कालावधी हा २१ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२४ पर्यंत आहे.

• एक झाड आईच्या नावाने : एक पेड माँ के नाम या अभियानाअंतर्गत आईच्या नावाने एक झाड लावत त्या सोबत सेल्फी घेऊन photocontest.nmrcl@gmail.com या ईमेल वर पाठवण्यास सांगण्यात आले आहे. लकी ड्रॉ द्वारे विजेत्यांना आकर्षक बक्षिस दिले जातील. या स्पर्धेचा कालावधी देखील २१ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२४ असा आहे.

या सोबतच नागपूर मेट्रोच्या सोशल मीडियाच्या माध्यमाने तसेच स्टेशन परिसरातील टी.व्ही स्क्रीन व मेट्रो ट्रेनमध्ये व्हिडियो आणि ऑडिओच्या माध्यमाने जनजागृती करण्यात येत आहे; तसेच स्टेशन परिसरात ठिकठिकाणी स्वच्छता शपथ पत्रके लावण्यात आले आहेत जेणेकरून आपण आपल्या दैनंदिन जीवनात स्वच्छतेचे महत्व  त्याचा अंगीकार करावा तसेच इतरांनाही त्याचे महत्व पटवून द्यावे